तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांकः- 1 JUL 2017 ४३८८

प्रति

**अध्यक्ष/सचिव,**

इन्फंट जिजस एज्युकेशन सोसायटी, केशवनगर, पुणे

**विषय -** राज्यात सन २०१० मध्ये सुरु केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्वयंअर्थसहायय तत्वावर परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.**

**२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.**

**३. शासन निर्णय इमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. ३१.०५.२०१७.**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवुन इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्याचे परिपत्रक काढले होते. तद्नंतर महाराष्ट्र स्वयं अर्थसहायियत शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ राज्यात लागु झाला आहे. तथापि, सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमाकरिता प्रस्ताव दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासुन राज्यात आजतागायत सुरु आहेत. सदर इंग्रजी शाळा हया बहुतांशपणे शहरी भागात आहे. त्यामुळे सदर शाळांना स्वर्य अर्थसहायय तत्वावरील जागेबाबतच्या अटीचे पालन करणे अवघड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता व मा. न्यायालयाने दिलेले निदेश विचारात घेता विदयार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवुन बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतुदींची पुर्तता करणा-या इंग्रजी प्राथमिक शाळांना स्वयं अर्थ सहायियत तत्वावर विशेष बाब म्हणुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासुन आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २ | पुणे | इन्फंट जिजस एज्युकेशन सोसायटी, केशवनगर, पुणे | इन्फंट जिजस प्रायमरी स्कूल, स. नं. ४९२/२ अे/१ बी, केशवनगर, कासारवाडी, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | इ. १ ली ते ५ वी | **२०१६-१७** |

**अटी व शर्ती :-**

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ आणि त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, अधिसुचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक इ. मधील तसेच यापुढे या संबंधित शासनाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या पुढील आदेशांचे पालन करणे. त्याचप्रमाणे, भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित शाळांच्या संस्था चालकांवर राहील. यामध्ये खेळाच्या मैदानासाठी लागणा-या जागेची अट क्र.२ च्या अटीच्या अधीन राहून शिथिल करण्यात येत आहे.

२. संबंधित शैक्षणिक संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थासोबत (जिल्हा परिषद/ महानगरपालिका/ नगरपलिका/ नगरपरिषदा/ कटक मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील. संबंधित शिक्षणाधिकारी यांचेकडे अशा करारपत्राची प्रत प्रथमतः यांचेकडे आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर मान्यता देण्यात यावी.

३. एका मुलासाठी एका वर्षासाठीचे शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार निर्धारित केलेले असावे.

४. संस्था किंवा शाळेबाबत आर्थिक अनियमिततेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

५. उपरोक्त बाबींची पुर्तता संबंधित शाळा करीत असल्यास या शासन निर्णयाच्या दिनांकापासुन **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा. त्यानुसार प्राप्त होणा-या प्रस्तावांची संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त निकषांची पुर्तता होत आहे किंवा नाही याची तपासणी करुन पात्र होणा-या शाळांची प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

७. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळाबाबत U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित शाळा** म्हणून नोंद करावी. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

८. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ व नियम २०१४ आणि २०१६ नुसार शाळेस शैक्षणिक शुल्क निर्धारित करणे बंधनकारक राहील.